## इयत्ता १० वी बोर्ड परीक्षा आज १ मार्चपासून सुरु

# फलटण तालुक्यात ११ परीक्षा केंद्रावर ४०२३ विद्यार्थी देणार परीक्षा

**फलटण :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे. कोल्हापूर विभागांतर्गत (माध्यमिक शालांत प्रमाणपत्र) इयत्ता १० वी परीक्षा शुक्रवार दि. १ ते दि. २६ मार्च कालावधीत फलटण शहर व तालुक्यातील ११ परीक्षा केंद्रांवर संपन्न होत असल्याची माहिती गटशिक्षणाधिकारी अनिल संकपाळ, परीक्षा नियंत्रक तथा शिक्षण विस्तार अधिकारी सी. जी. मठपती यांनी दिली आहे.

फलटण तालुक्यातील ११ परीक्षा केंद्रावर एकूण ४०२३ विद्यार्थी या परीक्षेस बसणार आहेत. त्यामध्ये केंद्र क्रमांक १००१ मुधोजी हायस्कूल फलटण केंद्रावर ७९९ विद्यार्थी परीक्षेस बसणार आहेत. केंद्र संचालिका सौ. एस. व्ही. बगाडे, केंद्र क्रमांक १००२ यशवंतराव चव्हाण हायस्कूल फलटण केंद्रावर ५०१ विद्यार्थी परीक्षेस बसणार आहेत. केंद्र संचालिका सौ. जयश्री विश्वनाथ रायते, केंद्र क्रमांक १००३ मालोजीराजे शेती विद्यालय फलटण केंद्रावर ४०० विद्यार्थी परीक्षेस बसणार आहेत. केंद्र संचालक विकास वसंतराव काकडे, केंद्र क्रमांक १००४ ज्योतिर्लिंग हायस्कूल पवारवाडी केंद्रावर ३०६ विद्यार्थी परीक्षेस बसणार आहेत. केंद्र संचालक अशोक सदाशिव माने, केंद्र क्रमांक १००५ सरदार वल्लभभाई पटेल हायस्कूल साखरवाडी केंद्रावर ४३८ विद्यार्थी परीक्षेस बसणार आहेत. केंद्र संचालक शिवाजी महादेव काळे, केंद्र क्रमांक १००६ सौ. वेणूताई चव्हाण हायस्कूल तरडगाव केंद्रावर २६६ विद्यार्थी परीक्षेस बसणार आहेत. केंद्र संचालक सुनिल वसंतराव क्षीरसागर, केंद्र क्रमांक १००७ जानाई हायस्कूल राजाळे केंद्रावर ३०६ विद्यार्थी परीक्षेस बसणार आहेत. केंद्र संचालक श्रीमती नीलम मनोहर गायकवाड, केंद्र क्रमांक १००८ श्रीमंत शिवाजीराजे इंग्लिश मिडीयम स्कूल, फलटण केंद्रावर १८० विद्यार्थी परीक्षेस बसणार आहेत.

केंद्र संचालक महेश पोपट निंबाळकर, केंद्र क्रमांक १००९ जयभवानी हायस्कूल तिरकवाडी केंद्रावर २५७ विद्यार्थी परीक्षेस बसणार आहेत. केंद्र संचालक ज्ञानेश्वर सयाजी काळे, केंद्र क्रमांक १०१० आदर्की बु।। माध्यमिक विद्यालय, आदर्की बु।। केंद्रावर २६२ विद्यार्थी परीक्षेस बसणार आहेत. केंद्र संचालिका कु. आशा सुनिल पवार, केंद्र क्रमांक १०११ उत्तरेश्वर हायस्कूल विडणी केंद्रावर ३०८ विद्यार्थी परीक्षेस बसणार आहेत. केंद्र संचालिका श्रीमती शुभांगी राजेंद्र शिर्के.

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) या परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्रावर बोर्डाने प्रकाशित केलेल्या अधिकृत वेळापत्रका प्रमाणे प्रवेश पत्र (रिसीट), ओळख पत्र व लेखनसाहित्य घेऊन शालेय गणवेशात वेळेपूर्वी अर्धा तास अगोदर उपस्थित रहावे, उशीरा येणाऱ्या विद्यार्थ्यास परीक्षा कक्षात प्रवेश दिला जाणार नाही. विद्यार्थ्याने परीक्षा केंद्राच्या आवारात भ्रमणध्वनी (मोबाईल), टॅबलेट, इलेक्ट्रॉनिक घडयाळ, पॉकेट कॅलक्युलेटर किंवा तत्सम इलेक्ट्रॉनिक साधने/उपकरणे परीक्षा केंद्रावर बाळगण्यास सक्त मनाई आहे.

विद्यार्थ्यांनी कोणत्याही गैरमार्गाचा अवलंब न करता कॉपीमुक्त वातावरणात निर्भयपणे परीक्षा द्यावी, तसेच परीक्षा व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी विद्यार्थी व पालकांनी सहकार्य करावे असे आवाहन गटशिक्षणाधिकारी अनिल संकपाळ, परीक्षा नियंत्रक तथा शिक्षण विस्तार अधिकारी सी. जी. मठपती यांनी केले आहे.

# वडोली निळेश्वरमधील अंतर्गत रस्त्याची समस्या निकाली

## रामकृष्ण वेताळ यांच्या प्रयत्नाने ७ लाखाचा निधी मंजूर



**मसूर :** वडोली निळेश्वर ता कराड येथील अंतर्गत रस्त्यासाठी निधीची आवश्यकता होती. निधी अभावी अनेक वर्ष रस्ता झालेला नव्हता. या रस्त्यासाठी भाजपा सातारा लोकसभा समन्वयक रामकृष्ण वेताळ यांच्या विशेष प्रयत्नाने ७ लाख रुपये निधी मंजूर झाला आहे. या रस्त्याची भूमिपूजन वेताळ यांच्या हस्ते झाले.यामुळे वडोली निळेश्वरच्या अंतर्गत रस्त्याची समस्या कायमची निकाली निघणार आहे.

वडोली निळेश्वर मधील प्रताप पवार यांच्या दुकानापासून बाळासो पवार यांच्या घरापर्यंतचा रस्ता अतिशय खराब झाला होता. या रस्ता दुरुस्तीची मागणी मागील अनेक वर्षांपासून होती. या रस्त्यासाठी ग्रामविकास मंत्री ना. गिरीश महाजन यांनी २५ १५ योजनेअंतर्गत ७ लाख रुपये निधी मंजूर केला आहे. या निधी मंजुरीसाठी भाजपा किसान मोर्चाचे सरचिटणीस रामकृष्ण वेताळ यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या पाठपुरावाला यश आल्याने हा अंतर्गत रस्ता लवकरच तयार होणार आहे.

यावेळी भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष प्रमोद गायकवाड, कराड उत्तर अध्यक्ष शंकर शेजवळ, उपाध्यक्ष शरद चव्हाण, सरचिटणीस तुकाराम नलावडे, जिल्हा सचिव दिपाली खोत, शंकर पाटील, अक्षय चव्हाण, अनिल खरात, बाळासाहेब पवार, बाळासाहेब डुबल उपसरपंच जालिंदर पवार, चेअरमन सुरेश पाटील, शशिकांत डुबल, बजरंग पवार, प्रकाश डुबल, संचालक जयराम डुबल, ग्रामपंचायत सदस्य दीपक पवार, रघुनाथ भोसले, हणमत पवार, बडा जगदाळे, बबन पवार, यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. युवा नेते रोहित डुबल यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

**समस्या सोडवण्यासाठी कटिबद्ध.**

**कराड उत्तर मधील गावांमध्ये रस्ते, पाणी, वीज या समस्या आजही शिल्लक आहेत. या समस्या सोडवण्यासाठी ना. गिरीश महाजन यांच्याकडे पाठपुरावा करून निधी मिळवण्यासाठी व विकासासाठी कटिबद्ध राहणार आहे. - रामकृष्ण वेताळ, सरचिटणीस,भाजपा किसान मोर्चा महाराष्ट्र.**

# खातगुण पाणीपुरवठा विहिरीलगत नवीन विहीर खोदण्यास मनाईचा ठराव मंजूर

**वर्धनगड :** खातगुण ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेमध्ये पाणीपुरवठ्याच्या विहिरी शेजारी पाचशे मीटर परिसरामध्ये विहीर किंवा बोअरवेल काढण्यास बंदी घालण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

खातगुण ता. खटाव जि.सातारा हे गाव क वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा असणारे यात्रा स्थळ गाव आहे. या ठिकाणी जागृत देवस्थान असल्याने भाविकांची रोज मोठ्या प्रमाणात येत असते. तसेच गावची वाढीव लोकसंख्येच्या विचार करता काही वर्षापासून प्रत्येक उन्हाळयामध्ये पाणीटंचाईला सामोरे जावे लागते.

या सर्व बाबींचा विचार करून भूजल अधिनियम २००९ च्या कायद्याच्या आधारे पिण्याचे पाणी पुरवठा करण्यात येणाऱ्या ग्रामपंचायतच्या विहिरी शेजारी नव्याने विहीर अथवा बोअरवेल काढण्याचा प्रथम ठराव ग्रामपंचायतीच्या मासिक मीटिंगमध्ये करण्यात आला व त्यानंतर झालेल्या ग्रामसभेत ग्रामस्थांमध्ये याविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. व पुढील काळातील येणाऱ्या भीषण पाणीटंचाईवर विचार करून या आधीच पाणीपुरवठा विहिरीच्या लगत पाचशे मीटर अंतरावर असणाऱ्या जुन्या विहिरी शासनाच्या नियमाप्रमाणे अधिग्रहण करून, नव्या विहिरी व बोरवेल खोदण्यासाठी सक्त मनाईचा ठराव सर्वानुमते ग्रामसभेत संमत करण्यात आला.

यावेळी खातगुण गावच्या सरपंच श्रीमती अमिना सय्यद यांनी ग्रामस्थांना याबद्दल मा.जिल्हाधिकारी सातारा, प्रांत अधिकारी माण खटाव, तहसीलदार खटाव व भूजल विभाग अधिकारी सातारा पत्रव्यवहार करून वरील ठरावाबाबत कळविण्यात आले असल्याचे सांगितले. यावर पुढे बोलताना उपसरपंच श्री शिवाजी लावंड म्हणाले चुकूनही या परिसरात कोणीही नव्याने विहीर किंवा बोरवेल काढण्याचा प्रयत्न केल्यास त्याच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल असा इशारा देण्यात आला आहे.

# गाव पंढरीच्या मातीतील लोककला जोपासणार देऊर गाव

## इथे नाही डॉल्बीचा दणदणाट अन वेडावाकडा धिंगाणा



**कोरेगाव :** प्रत्येक गावात देवाची यात्रा, मिरवणुका आणि उत्सवात ढोल लेझीमचे डाव रंगायचे आन सारा माहोल रंगायचा अनोख्या उत्साहात, माणसं एकत्र यायला ही ढोलवरची एक थाप पुरेसी, ढोलावर टिपरी घुमली की गावकऱ्यांनी ताल धरलाच म्हणून समजायचा, लेंगा सदरा घातलेली जुनी जाणती मंडळी अगदी आवेशात डावाला आकार द्यायची यात नवी तरुणाई त्याच्याकडे पाहत पावलावर पाऊल टाकून हा लेझीमचा डाव अंगात आत्मसात करायची असा जुन्या नव्याचा संगमातून गावच्या चौकात लोककला रात रातीला जागवली जायची बरं प्रत्येक गावची ढोलाची चाल आन लेझीमचा ठेका वेगवेगळा अगदी तिथला सिक्रेट फॉर्म्युला,

पिढ्यानपिढ्या जुन्या नव्यानी फक्त हाताचे इशारे समजून घेत आन पावलाकडे बघत ठेका धरला कित्येक जत्रेच्या छबिण्याच्या रात्री लोककलेने जागवून पुढे पुढे पोहोचवला अगदी जशाचा तसा, याच कुठे शिक्षण न्हाई की लिखित नियम फक्त अनुकरण करीत ही लोककला पिढ्यानंपिढ्या पुढे जात राहिली हे विशेष मानायला हवयं.

पण हल्ली आधुनिकतेच्या नावाखाली डॉल्बी आली आणि सारच लोकचित्र हरवलं आन सुरू झाला वेडावाकडा धिंगाणा.. गावातली पोरं या डॉल्बीलाच आपली संस्कृती मानू लागले, मग यात्रा,जत्रा, वराती आण मिरवणूक सगळ्यात ही लोककला मागे पडली, डॉल्बी पुढे हिचा आवाज दबला गेला

आपल्या वैभवशाली लोकसंस्कृतीवर मर्यादा आल्या तरुणाई या डावात रमत नाही, लेंगा सदरा घातलेली पिढी आहे तोपर्यंत हा वारसा जीन्स टी शर्ट मधील पिढीला समजला पाहिजे प्रत्येक गावाने आपली ढोलाची चाल, लेझीमचा ठेका गावच्या घराघरातील तरुणाई पर्यंत पोहचवला पाहिजे, कारण आधुनिक म्हनून आपण आपली लोकजीवनाची मातीची मूळ उखडून टाकण्याऐवजी संवर्धन केले पाहिजे.

ग्लोबल आणि श्रीमंती जमान्यात हाच आपला समृद्धीचा आणि आनंदाचा पासवर्ड असणार आहे तो विसरुन कसा चालेल.

# कपडे धुण्याच्या पावडरीच्या कारखान्यावर मुंबई येथील कंपनीच्या लीगल टीमचा छापा

**कुरुंदवाड :** कॉपीराईट ॲक्टचा भंग करून बनवण्यात येत असलेल्या कपडे धुण्याच्या पावडरीच्या कारखान्यावर मुंबई येथील कंपनीच्या लीगल टीमने छापा टाकून दोघांना ताब्यात घेतले असून धुण्याच्या साबणाचा साठा पॅकिंगचे मटेरियल व कच्चामाल एकूण तीस टन माल ताब्यात घेतला आहे त्यामुळे दतवाड परिसरात खळबळ उडाली आहे.

दतवाड, ता. शिरोळ येथे दानवाड रस्त्यावर बंद पडलेल्या एका धाब्याच्या गोडाऊनमध्ये गेली सहा ते आठ महिने झाले कपडे धुण्याचा पावडरीचा कारखाना सुरू होता. या कारखान्यात नामवंत अशा धुण्याच्या पावडरीच्या कंपनी चा नामसदृश्य वापर करून कॉपी राईट एक्टचा भंग करून पावडर तयार करून शिरोळ , इचलकरंजी व कर्नाटकातील सीमा भागात कपडे धुणाची पावडरची विक्री करण्यात येत होती याची माहिती त्या कंपनीच्या लीगल टीमला मिळाल्यानंतर मंगळवारी रात्री गोडाऊन वर छापा टाकून कपडे धुण्याचा पावडरीचा तयार माल कच्चा माल, पॅकिंग करायचा पिशवी, व मशिनरी असे साहित्य जप्त करून दोघांना ताब्यात घेतले व ती टीम मुंबईला रवाना झाली आहे. मात्र याबाबत स्थानिक पोलीस व अन्न व औषध प्रशासन यांना याबाबत काहीच माहिती नाही.

# येत्या रविवारी 'हॅप्पी स्ट्रीट' कार्यक्रमाचे आयोजन

**सांगली.:** सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई आणि जिल्हा प्रशासन सांगली यांच्या समन्वयातून महसंस्कृती महोत्सवाचे दि २ मार्च ते ६ मार्च रोजी कल्पद्रुम मैदान सांगली येथे आयोजन करण्यात आले असून याचाच एक भाग असलेला 'यलो सांगली हॅप्पी स्ट्रीट' हा कार्यक्रम दि. ३ मार्च रोजी सकाळी ८ ते ११ या वेळेत विश्रामबाग चौक येथे होत असून यामध्ये विविध प्रकारचे कार्यक्रम होणार आहेत. मल्लखांब, कबड्डी, योगासने आणि अनेक मैदानी खेळांची प्रात्यक्षिके, तसेच रांगोळी काढणे, बैलगाडी, टांगा सफर, त्याच बरोबर झुंबा डान्स,ी सांगलीकरांना घेता येणार आहे.

# मुस्लीम ओबीसी संघटनेच्या शिरोळ शहराध्यक्षपदी शमा खलिफ



**शिरोळ :** येथील ऑल इंडिया मुस्लिम ओबीसी संघटनेच्या शिरोळ शहराध्यक्षपदी शमा राजू खलिफ यांची निवड करण्यात आली.पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष एम.जी.बागवान व शिरोळ तालुका अध्यक्षा रेश्मा चिल्लू यांच्या हस्ते नियुक्ती पत्रे देण्यात आले.

सामाजिक कार्यकर्त्या शमा खलिफ यांनी आजवर केलेल्या समाजाभिमुख कार्यामुळे त्यांची निवड करण्यात आली आहे. या निवडी बद्दल दत्त उद्योग समूहाचे अध्यक्ष गणपतराव पाटील यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.याप्रसंगी कार्यकारी संचालक एम.व्ही. पाटील,शेखर पाटील,ॲड. प्रमोद पाटील,अब्दुल खलिफ आदि उपस्थित होते.

# ठाण्यातून तीन अल्पवयीन मुले बेपत्ता

**ठाणे:** ठाण्यातील किसनगर, वागळे इस्टेट भागातील दोन १५ वर्षीय आणि एक १४ वर्षीय अशी तीन मुले बेपत्ता झाली आहे. त्यांचे अपहरण झाल्याचा संशय पालकांनी व्यक्त करीत याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. त्यांचा शोध घेण्यात येत असल्याचे श्रीनगर पोलिसांनी गुरुवारी सांगितले.

किसननगर भागातील रहिवासी असलेली ही तिन्ही मुले २८ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ६.३० ते सायंकाळी ७.३० वाजेपर्यंतच्या कालावधीत घरातून बाहेर पडले. परिसरात आणि नातेवाईकांकडे सर्वत्र शोध घेउनही त्यांचा शोध लागला नाही.

# माझ्यात ना मग्रुरी, ना लाचारी : सयाजी शिंदे

## लाल बहादूर शास्त्रीमहाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन




**सातारा :** जीवन जगताना माणसासमोर अनेक अडचणी येतात. त्या पार करत मार्गक्रमण करावे लागते. या अडचणी पार केल्यानंतर आपण जेव्हा यशाच्या शिखरावर पोहचतो त्यावेळी आपल्यात मग्रुरी येता कामा नये. हे पथ्य पाळत असताना गरीब असलो तरी कोणापुढेही लाचार होता कामा नये. ध्येयाने जीवन जगत गेला तर कधीच मागे फिरण्याची वेळ येणार नाही. असे मत अभिनेते, दिग्दर्शक व साताररच्या लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी सयाजी शिंदे यांनी व्यक्त केले.

लालबहादूर शास्त्री महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघाच्या वतीने आयोजित माजी विद्यार्थी मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष विजय मांडके, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ आर. व्ही. शेजवळ, प्राचार्य डॉ यशवंत पाटणे, शिरीष चिटणीस, श्रीकांत कात्रे, दीपक शिंदे यांच्यासह माजी विद्यार्थी उपस्थित होते.

सयाजी शिंदे म्हणाले, विद्यार्थ्यांनी आयुष्यात प्रत्येक टप्प्यावर गुरु बदलला पाहिजे. ज्यांच्याकडून जास्तीत जास्त शिकता येईल असा प्रयत्न व्हायला हवा. लाल बहादूर शास्त्री महाविद्यायातच मिळालेले एक पुस्तक आणि एका भिक्याच्या भाकरीच्या भूमिकेने मला ५०० चित्रपट आणि आठ भाषांमध्ये आयुष्याची भाकरी मिळवून दिली. प्रत्येक भूमिका करताना ती अत्यंत तन्मयतेने करत गेलो. दिलेला शब्द आणि वेळ पाळत गेलो. त्याठिकाणी कोणाशीही प्रतारणा केली नाही. माणसाचे आयुष्य हे दोन श्वासांमधील अंतर आहे. चांगला श्वास घेता आला पाहिजे आणि पुढच्या चांगल्या श्वासाची व्यवस्था केली पाहिजे. कोणी कितीही मोठा झाला तरी सर्व पुन्हा याच धरतीवर सोडून जाणार आहे. त्यामुळे श्रीमंती आणि त्याचा बडेजाव बाळगणारे हे बावळट आहेत असा टोलाही त्यांनी यावेळी लगावला.

ते पुढे म्हणाले, या श्वासासाठी लागणारी झाडे हीच याठिकाणची खरी संपत्ती आहे. तीच आपल्याला चांगला श्वास देऊ शकतात. सर्वांच्या अगोदर तीच धरतीवर आली आहेत आणि तीच शेवटपर्यंत राहणार आहेत. त्यामुळे तुमचे नाव आज ना उद्या पुसले जाईल फक्त लावलेले झाड उरत राहिल. स्वत:पासून सुरुवात करा आणि लागले तर मदतीला घ्या. पण, कोणीतरी मला मदत करेल आणि मी काही करेन असे असेल तर तुम्ही अजिबात काही करु शकणार नाही. स्वार्थाने बरबटलेल्या या जगात काहीतरी मिळविण्याचे ध्येय ठेवा आणि वाटचाल सुरु करा. अशक्य काहीच नाही अन्यथा कितीही हुशार असला तरी त्याचा उपयोग होणार नाही. नवनिर्मितीमध्ये आपले योगदान असले पाहिजे आणि विध्वंसापासून दूर राहिले पाहिजे असा सल्लाही त्यांनी डॉ एपीजे अब्दुल कलाम फाउंडेशन तामिळनाडू आणि स्पेस झोन ऑफ इंडिया यांच्या प्रकल्पासाठी निवड झालेल्या ललीत गजानन वाडेकर या विद्यार्थ्याचा सत्कार करताना दिला. ललित गजानन वाडेकर याचा सत्कार प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सयाजी शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विजय मांडके यांनी केले. प्राचार्य डॉ यशवंत पाटणे यांनी आभार मानले. यावेळी समन्वयक प्रा. आर.आर. साबळे , माजी विद्यार्थी रमेश कदम , दिपक देशमुख, दिपक पटवर्धन, राजेंद्र लावंघरे, प्रा. जयवंत जाधव , हेमंत जिरेसाळ , गुरुनाथ जाधव वगैरे अनेक माजी विद्यार्थी उपस्थित होते.

**चित्रपटाच्या राजकारणापेक्षा सध्याची स्थिती वाईट**

गल्लीत गोंधळ दिल्लीत मुजरा या चित्रपटातील भूमिका आणि चित्रपटातील राजकारण आणि सद्य स्थिती याबाबत सयाजी शिंदे यांना विचारले असता सध्या त्यापेक्षा राजकारणात भयानक स्थिती झाली असून मतदारांच्या मतदानाचा हक्कच काढून घेतल्यासारखे वाटत असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.


Statement about ownership and other particulars about the newspaper **DAILY RAJDAND**

**FORM IV (See Rule 8)**

| | | |
|---|---|---|
| 1 | Place of Publication | Rajkamal Bldg. Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara (M.S) |
| 2 | Periodicity of its Publication | Daily |
| 3 | Printer's Name (Whether Citizen of India? If foreigner state the country of origin) | Naresh V. Desai |
| | Address | C/o Viva Air Travels, Rajkamal Bldg. Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara (M.S) |
| 4 | Publisher's Name (Whether Citizen of India? If foreigner state the country of origin) | Naresh V. Desai |
| | Address | Jagdamba Krupa, 416 Sadar Bazar, Satara |
| 5 | Editor's Name (Whether Citizen of India? If foreigner state the country of origin) | Naresh V. Desai |
| | Address | Rajkamal Bldg. Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara (M.S) |
| 6 | Names and address of individuals who own the newspaper and/or partners or Shareholders holding more than one percent of the total capital | Naresh V. Desai |
| | Address of above | Rajkamal Bldg. Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara (M.S) |

I, Naresh V. Desai, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

**Naresh V. Desai**

Editor, Publisher and Printer, Daily Rajdand, Rajkamal Bldg. Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara (M.S).

29-02-2024